MHRG190001452024

::**विशेष दरखास्त क्र.१८/२०२४ मधील निशाणी क्र.२५ वरील आदेश** ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी मुळ अर्जदार क्र.४ मयत झाल्यानंतर त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे कथन की, मुळ अर्जदार क्र.४ हया दिनांक ०७.०३.२०२५ रोजी मयत झाल्या आहेत. मयत मुळ अर्जदार क्र.४ यांचे वारस म्हणजेच प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र.१ ते ३ मुलगे आणि आणि अर्जदार क्र.४/४/१ ते क्र.४/४/३ हे नातू होय. सदर वारसांशिवाय कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मुळ अर्जदार यांचे वारस दिनांक ०६.०६.२०२५ रोजीपर्यत अभिलेखावर घेणे आवश्यक होते परंतु मुळ अर्जदारांचे कायदेशीर वारसांना प्रस्तुत दरखास्त अर्जाची कोणतीही माहिती नसल्याने त्यांनी त्यांचे वकीलांना मुळ अर्जदार क्र.४ मयत झाल्याचे सांगितले नव्हते. त्यानंतर वकीलांना मुळ अर्जदार मयत झाल्याचे समजल्यानंतर प्रस्तुतचा वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुत अर्जास विरोध करताना, सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी म्हणणे सादर करुन प्रस्तुत अर्जास सक्त हरकत नोंदविली आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जास योग्य व संयुक्तीक कारण दिलेले नाही तसेच मुदतीच्या कायदयाची बाधा येत असल्याने प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी दिलेले म्हणणे वाचले. अर्जदारातर्फे वकील तसेच सामनेवाला क्र.१ व २ तर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री.योगेश तेंडुलकर व सामनेवाला क्र.३ तर्फे श्रीमती वर्षा पाटील यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०५. अर्जदार यांनी दिलेला अर्ज, सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी दिलेले म्हणणे याचे अवलोकन केले. प्रस्तुतचे प्रकरण भुसंपादन अर्ज क्र.०५/२००६ मध्ये झालेला न्यायनिर्णय व हुकूमनाम्याप्रमाणे अंमलबजावणीसाठी दाखल केले आहे. मुळ अर्जदार क्र.४ मयत झाल्याने वारस अभिलेखावर घेण्यासाठी २७ दिवसांचा झालेल्या विलंबाचा निशाणी क्र.२३ वरील अर्ज मंजुर करण्यात आला आहे. प्रस्तुत मुळ अर्जाचा योग्य न्यायनिवाडा करण्यासाठी सर्व पक्षकारांना प्रकरणामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जातील दिलेले कारण संयुक्तीक असुन अर्ज मंजुर होणेस पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**:: <u>आदेश</u> ::**

१. अर्जदार यांचा वारस अभिलेखावर घेण्याचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार म्हणुन सामील होऊन दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर मुदतीत दाखल करण्यात यावी.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA
Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.01.03 13:21:13 +0530

महाड
दिनांक ०३.०१.२०२६

**(श्रीमती एच.आर.जाधव)**
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, महाड

दिनांक ०३.०१.२०२६